- उत्तम फळांसाठी एका दिवसाआड भेंडीची तोडणी करावी. भेंडी तोडणी सकाळी किंवा सायंकाळी करावी. त्यामुळे भेंडीचा ताजेपणा व रंग जास्त काळ टिकून राहतो.

### निर्यातीसाठी भेंडी फळांची निकष

- पिवळी, वाकडी, किडग्रस्त, इजा किंवा डाग असलेली फळे काढून टाकावी.
- निर्यातक्षम फळे-६ ते ९ सेमी लांब, गडद हिरवा रंग, लुसलुशीत, कोवळी व रुचकर असावीत.
- फळे वजन- सरासरी १५ ग्रॅम /फळ
- फळामध्ये चोथ्याचे प्रमाण कमी असावे.
- युरोपयीन व इतर बाजारपेठेसाठी फळामध्ये कीड रोग नाशकांचे अवशेष नसावेत.

### भेंडी - ग्रेडिंग/पॅकिंग युनिट

- तोडणी, झालेली भेंडी पॅक हाऊस मध्ये एकत्रित करावी.
- एकसारखी फळे प्लॅस्टिक क्रेटसमध्ये टाकून ग्रेडींग/सार्टींग करावी

**पिक कालावधी** -११०-१२० दिवस

**उत्पादन** - १५ ते २० टन प्रति हेक्टर

### भेंडी निर्यातदारांची यादी

| निर्यातदार कंपनीचे नाव | मोबाईल क्र. | ई-मेल |
|---|---|---|
| ऑल सिझन एक्सपोर्ट | ९८६७४५५५४४ | allseasonexports@gmail.com |
| थ्री सर्कल एक्सपोर्ट | ९८२०१२४८६५ | three.circle10@gmail.com |
| नोज ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. | ९९२२१००८४९ | tejagroindiapl@gmail.com |
| अनुष्का इमपेक्स नाशिक | ९८६०७०९०६० | aimnashik@hotmail.com |
| रोबो इंटरनॅशनल, पुणे | ९८९००९३३६३ | abhi@rainbowinterational.in |

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१४९/२०१८

**आर्थिक सहाय्य**

**प्रकल्प संचालक**

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा),
रेऊ नगर, नकाणे रोड,
धुळे - ४२४ ००५.
फोन - ०२५६२ (२२३००५)

# एकात्मिक भेंडी उत्पादन तंत्रज्ञान




**लेखक**

**श्रीमती प्राची काळे**
प्रयोगशाळा तंत्रज्ञ
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

**श्री. रोहित वि. कडू**
शास्त्रज्ञ (उद्यानविद्यास)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

**संपादक**

**डॉ. किरण कोकाटे**
संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**प्रकाशक**

**डॉ. पंकज पाटील**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१४९/२०१८

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**

**कृषि विज्ञान केंद्र,**

कृषि महाविद्यालय, धुळे-४२४००४
दुरध्वनी क्र. (०२५६२)२३०३६२
संकेतस्थळ: http://www.kvkdhule.org
*E-mail* : pckvkdhule@gmail.com
pckvkdhule@rediffmail.com

# एकात्मिक भेंडी उत्पादन तंत्रज्ञान

**सुधारीत वाण-** फुले उत्कर्षा, फुले विमुक्ता, परभणी क्रांती, अर्का अनामिका

**हंगाम -** खरीप - जुलैचा पहिला आठवडा (१५ जून ते १५ जुलै)

उन्हाळी - जानेवारीचा तिसरा आठवडा (१५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी)

**लागवड अंतर -** ३० X १५ से.मी.

खरीप हंगामामध्ये लागवडीचे अंतर जास्त ठेवल्यास शेतामध्ये हमा खेळती राहून रोग व कीडीचा प्रादूर्भाव कमी होण्यास मदत होते.

**हेक्टरी बियाणे प्रमाण -** १२ ते १५ किलो

**बियाणे प्रक्रिया -** भेंडीचे उगवण व चांगल्या वाढीसाठी लागवडीपूर्वी जैविक बीजप्रक्रिया फायदेशीर दिसून आली आहे. यासाठी, अॅझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळणारे जीवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाणेस चोळावे.

जैविक बिज प्रक्रिया करतांना जैविक घटक बियाण्यावर हाताने चोळू नये. बियाण्याचे बाहेरील नाजूक आवरण निघून बियाण्याची उगवण क्षमता कमी होते. यासाठी बियाणे प्लास्टिक पिशवीवर अथवा गोणीवर पातळ थरामध्ये टाकावे. बियाण्यावर जैविक घटक टाकून प्लॅस्टिक पिशवी दोन व्यक्तींनी अलगत हलवावी. जैविक घटकांचा लेप बियाण्यावर एकसारखे चिटकण्यास मदत होते.

**भेंडीचे एकात्मिक खत व्यवस्थापन :**

- शेणखत २० टन प्रति हेक्टरी पेरणीपुर्वी दोन ओळींमध्ये निंबोळी पेंड -२५० किलो, ट्रायकोडर्मा ६ किलो,पी.एस.बी. २.५ किलो अधिक अझोटोबॅक्टर-२.५ किलो प्रति हे. टाकून मातीने झाकून घ्यावे.
- रासायनिक अन्नद्रव्य मात्रा, नत्रःस्फुरदःपालाश १००:५०:५० किलो/हेक्टर (सरळ खतांचे प्रमाण बॅग प्रति हेक्टर-युरीया -४.५, सिंगल सुपर फॉस्फेट -६ व म्युरेट ऑफ पोटॉश -१.५) नत्र खतांच्या एकूण मात्रेपैकी ५० टक्के मात्रा पेरणीच्यावेळी दयावी. उर्वरीत ५० टक्के मात्रा लागवडीनंतर ३ समान हप्त्यामध्ये, ३०, ४५ व ६० दिवसांनी विभागून द्यावी.
- माती परिक्षणावर आधारीत सुक्ष्म अन्नद्रव्य कमी असलेल्या जमिनीत झिंक सल्फेट + फेरस सल्फेट प्रत्येकी २० किलो/हे आणि बोरॅक्स ५ किलो/ हे प्रमाणे द्यावे. किंवा
- झिंक सल्फेट + फेरस सल्फेट ०.५% प्रत्येकी + बोरीक अॅसिड ०.२ % पेरणी नंतर ३० ते ४५ दिवसांनी फवारावे.

**आंतर मशागत /पाणी व्यवस्थापन**

- लागवडीनंतर २ आठवड्यांनी रोपांची विरळणी करावी
- पिकास दर ६ ते८ दिवसांचे अंतराने पाणी द्यावे.
- पिकातील तणाची खुरपणी करावी.
- खुरणीनंतर पिकास मातीची भर द्यावी.

**भेंडी पिकातील एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन :-**

१) भेंडी लागवडी भोवती मका लागवड करावी.

**२) रस शोषक किडी (तुडतुडे, पांढरी माशी, मावा) नियंत्रणासाठी;**

- पिवळे चिकट सापळे (येलो स्टिकी ट्रॅप्स) १०- १५ नग/हेक्टरी ठिकठिकाणी लावावीत
- सुरुवातीच्या कोवळ्या अवस्थेतील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी रासायनिक बीज प्रक्रिया करावी. यासाठी, इमिडॉक्लाप्रीड (४८% एफ.एस.) -५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे.
- जैविक नियंत्रण पद्धती : बिव्हेरीया बासीयाना ५ किलो प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात फवारणी करावी.
- व्हर्टीसिलीय लॅकेनी ४० ग्रॅम/१० लिटर पाणी + कपभर दुध या प्रमाणात फवारावी.

**३) फळे पोखरणारी अळीसांठी नियंत्रणासाठी;**

- कामगंध सापळे १० नग प्रति हेक्टरी लावावेत.
- ट्रायकोकार्ड १० नग प्रति हेक्टरी लावावेत.
- बी.टी.जीवाणू १ ते १.५ किलो प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यामध्ये फवारणी करावी.
- वनस्पतीजन्य किटकनाशक ४ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. किडलेल्या भेंडी फळे तोडून नष्ट कराव्यात.
- किडीचा प्रादुभार्व आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेल्यास, रासायनिक किड नियंत्रणाची व्युहरचनेचा अवलंब करावा.
- **रस शोषक किडी (तुडतुडे, पांढरी माशी, मावा) नियंत्रणासाठी;**
  - इमिडॉक्लाप्रीड (७०% डब्ल्यु. जी.)-०.७ ग्रॅम किंवा थॉयोमेथोक्झाम २ ग्रॅम किंवा डायमेथोएट २० मिली प्रति १० लिटर पाण्यात वापरावी.
- **फळे पोखरणारी अळीसांठी नियंत्रणासाठी;**

  क्विनॉलफॉस (२५% ई.सी.) २० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन (२.८ % ई.सी.) ८ मि.ली. किंवा लॅमडा सायहॅलोथ्रिन (५% ई.सी.)६ मि.ली. प्रति १०लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

**भेंडीवरील प्रमुख रोग व व्यवस्थापन**

**भुरी -** ८०% गंधक २० ते २५ ग्रॅम /१० लिटर पाण्यात फवारणी करावी

**पानावरील ठपके -** कॉपर ऑक्झीक्लोराइड २.५ ग्रॅम किंवा मन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात फवारणीसाठी वापरावी.

**भेंडी काढणी**

- लागवडीपासून ४० ते ४५ दिवसात भेंडीस फुले येण्यास सुरवात होते. त्यानंतर आठवडाभरात फळे लागण्यास सुरवात होते. साधारणतः ५५ ते ६० दिवसांनी फळे तोडण्यास तयार होतात. दर ३ ते ४ दिवसांनी फळे काढणीस येतात.